# प्रेसनोट

नाशिक,
दि. ०७/११/२०२३

**आलोसे रविंद्र बाळासाहेब मल्ले, पोलीस हवालदार, नेम.तालुका पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामिण सध्या नेम विल्होळी पोलीस चौकी.आरोपी २. तरुण मोहन तोडी, खाजगी इसम,रा. पंचवटी, नाशिक. यांनी ३५,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | नाशिक |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | पंचवटी पोलीस ठाणे, नाशिक शहर गु.र.नं. ५२२/२०२३, |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७,१२ प्रमाणे |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | १) रविंद्र बाळासाहेब मल्ले, वय - ३९, पोलीस हवालदार, नेम.तालुका पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामिण सध्या नेम. विल्होळी पोलीस चौकी.<br>२. तरुण मोहन तोडी, वय - ४३, खाजगी इसम, रा. ४६१५ जाजुवाडी हिमालय बॅकेसमोर, इंद्रकुंड पंचवटी, नाशिक. |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | ७०,०००/- रुपये ( तडजोडअंती ) |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ३५,०००/- रुपये |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार यांचा विल्होळी पोलीस चौकी येथे जमा करुन घेतलेला ट्रक सोडण्यासाठी आलोसे रविंद्र बाळासाहेब मल्ले, पोलीस हवालदार, नेम. तालुका पो.ठाणे, नाशिक ग्रामिण यांनी तक्रारदार यांचे कडे १,००,०००/-रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे रविंद्र बाळासाहेब मल्ले, पोलीस हवालदार, नेम. तालुका पो.ठाणे, नाशिक ग्रामिण यांनी तक्रारदार यांचे कडे १,००,०००/- रुपये लाचेची मागणी केली व तडजोडअंती ७०,०००/- रु. लाचेची मागणी करून पहिले ३५,०००/-रुपये रक्कम खाजगी इसम तरुण मोहन तोंडी, व्यवसाय- ट्रान्सपोर्ट, रा. पंचवटी नाशिक यांचेकडे देण्यास सांगितल्याने दि. ६.११.२०२३ रोजी तरुण मोहन तोंडी यांनी ३५,०००/- रुपये लाचेची रक्कम ओम नागपुर ट्रान्सपोर्ट, हिरावाडी, नाशिक येथे स्विकारल्याने त्यांना पकडण्यात आले असुन दोघांविरुध्द पंचवटी पोलीस ठाणे, नाशिक शहर गु.र.नं. ५२२/२०२३, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १२ प्रमाणे दि. ०७.११.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.


संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल :- spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२५३-२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲपक्र :- ९९३०९९७७००


( नरेंद्र भा.पवार )
पोलीस उपअधीक्षक ( वाचक )
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक

पोलीस उपअधीक्षक/पोलीस अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, नाशिक परिक्षेत्र, नाशिक
सत्यमेव जयते